# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO २१००१:२०१८) (ISO/IEC २७००१:२०१३)

शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४ था मजला, ४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१

दू. क्र.: ०२२-६२५४२१००/१०३/१२१/१२४

संकेतस्थळ : www.msbte.ac.in ई-मेल secretary@msbte.com

जा.क्र.मरातंशिमं/ का-३१/आस्था/विभिषिका दिन/२०२५/ 4879 दिनांक 13 AUG 2025

प्रति,
उपसचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ,
विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर ,नागपूर

विषय:- १४ ऑगस्ट हा दिवस "विभाजन एक विभिषिका दिन" म्हणून साजरा करणेबाबत.

संदर्भ:- १) तंत्र शिक्षण संचालनालयाचे पत्र क्र. DTEM-D१६०STAT/३/२०२५-DESK१६, दि.१२.०८.२०२५

२) Hon. Joint Secretary Department of school education & literacy, New Delhi, GoI Letter No. D.O.No.१७-३२/२०२४-Coord, date ०९.०८.२०२४

३) Hon. Director-P&AP, AICTE, Letter No. AICTE/P&AP/Circular/२०२४ date ०७.०८.२०२४

उपरोक्त विषयाबाबतच्या संदर्भ क्र. १ च्या पत्रान्वये संचालनालयाने १४ ऑगस्ट हा दिवस भारताच्या इतिहासातील सर्वात मोठया लोकवस्ती विभाजनाच्या संदर्भात लाखो भारतीयांच्या विस्थापनाची आठवण करून देतो, ज्यामध्ये असंख्य लोकांचे प्राण गेले आणि कोटयावधी लोकांनी आपल्या घरादाराचा त्याग केला. या दिवशी लोकांनी दिलेल्या बलिदानाची आणि विभाजनाच्या वेळी झालेल्या वेदना, त्रास व दु:ख यांना उजाळा देणे आणि सदर दिवसाच्या इतिहासाची युवकांना जाणीव व्हावी म्हणून दरवर्षी १४ ऑगस्ट हा दिवस "विभाजन एक विभिषिका स्मृतिदिन" म्हणून साजरा करण्याचे आवाहन केलेले असल्याचे कळविलेले आहे. तसेच या पार्श्वभूमीवर, नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा (NSD) यांच्यातर्फे एक विशेष नाटक तयार करण्यात आले आहे. सदर नाटक विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता वाढवण्यासाठी आणि विभाजन काळातील घटनांची समज निर्माण करण्यासाठी तयार करण्यात आले आहे. या नाटकाची इंग्रजी व हिंदी भाषेतील लिंक विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सोबत जोडलेल्या पत्रामध्ये नमूद करण्यात आलेली असल्याचे कळविलेले असून संदर्भिय पत्रान्वये प्राप्त निर्देशानुसार आपल्या अधिनस्त सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित पदवी/पदविका अभ्यासक्रम राबविणाऱ्या सर्व संस्थांना त्यांच्या संकेतस्थळावर सदर नाटकाची लिंक अपलोड करून प्रसारित करण्याची कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. जेणेकरून सर्वांना त्याचा सहज उपयोग करता येईल. तसेच संदर्भिय पत्रामधील निर्देशानुसार पत्रातील नमुद प्रदर्शने व कार्यक्रम आयोजित करण्याबाबत सुध्दा निर्देश दिलेले आहेत. (सोबत पत्राची प्रत सहपत्रासह)

उपरोक्त निर्देशाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, सदर नाटकाची लिंक अपलोड करून प्रसारित करण्याची कार्यवाही करण्याबाबत व संदर्भिय पत्रामधील निर्देशानुसार पत्रातील नमुद प्रदर्शने व कार्यक्रम आयोजित करण्याबाबत आपल्या अधिपत्याखालील संस्थाना आपल्या स्तरावरून सूचना देण्यात याव्यात. तसेच

विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार आपल्या कार्यालयाच्या संकेतस्थळावर आणि आपल्या अधिपत्याखालील संस्थांच्या संकेतस्थळावर सदर नाटकाची लिंक अपलोड करून प्रसारित करण्याची कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दि.१८.०८.२०२५ पर्यंत या कार्यालयास सादर करावा.

( उमेश टे. नागदेवे )
सचिव
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

प्रत:- उपसचिव, का. क्र. ७१ यांना कळविण्यात येते की, सदर नाटकाची लिंक कार्यालयाच्या संकेतस्थळावर अपलोड करून प्रसारित करण्याची कार्यवाही करावी